| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **कोल्हापूर जिल्हा पोलीस भरती - २०२१** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना

## लेखी चाचणी

➢ कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२१ मधील लेखी परिक्षा करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दि.२०/०२/२०२३ रोजी कोल्हापूर जिल्हा पोलीस दलाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

➢ कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२१ ची लेखी परिक्षा दि.०२/०४/२०२३ रोजी सकाळी ठिक ०८.३० वाजता कोल्हापूर शहारातील खालील महाविद्यालयामध्ये आयोजित केलेली आहे.

| अ.क्र. | परिक्षा केंद्र | उमेदवारांचे चेस्ट क्रमांक |
|---|---|---|
| १ | डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिरींअग अॅन्ड टेक्नॉलॉजी, जुनी बिल्डींग,पुर्व बाजू,कसबा बावडा,कोल्हापूर | पहिला मजला<br>खोली क्र.१२१ ते १२६<br>(००३ ते ८६०) |
| | | दुसरा मजला<br>खोली क्र.२१३ ते २१७<br>(८६५ ते १५७४) |

➢ लेखी परिक्षेसाठी महाआयटीकडुन प्रवेशपत्र निर्गमीत करण्यात आलेले असून ते http://policerecruitment२०२२.mahait.org या वेबसाईडवरुन उमेदवारांनी आपला युजर आयडी व पासवर्डचा वापर करुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन स्पष्ट दिसेल अशी प्रिंट काढावी.

➢ उमेदवारांनी लेखी परिक्षेकरीता दि.०२/०४/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा. त्यांना प्रवेश पत्रात नमुद केलेल्या परिक्षा केंद्रावर शारीरिक चाचणीवेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र / ओळखपत्र तसेच लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र घेवून वेळेत उपस्थित रहावे तरच परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल, अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

➢ उमेदवारांने स्वतःची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेले आधारकार्ड,पॅनकार्ड,मतदानकार्ड,पासपोर्ट,महाविद्यालयीन ओळखपत्र,ड्रायव्हिंग परवाना यापैकी

कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र व ऑनलाईन प्रवेशपत्राची प्रत (हॉल तिकिट ) सोबत आणावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

- उमेदवारांनी सदर लेखी परिक्षावेळी काळे पेन सोबत आणणेचे आहे. तसेच उमेदवारांनी सोबत येताना इतर अनावश्यक वस्तु आणु नये, आणल्यास डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज मेन गेटच्या बाहेर ठेवण्यात येईल त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहिल.

- लेखी परिक्षावेळी उमेदवारांनी मोबाईल फोन,डिजीटल डयरी,मायक्रोफोन,कॅल्क्युलेटर,नोट पॅड,नोट्स पुस्तके,ईअरफोन,ब्ल्युटूथ,स्मार्ट वॉच तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे, प्रतिबंधक वस्तु स्वत:जवळ बाळगणे पुर्णत: मनाई आहे. अशा वस्तु उमेदवारांकडे आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवून त्याची उमेदवारी रद्द करण्या बरोबर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

- एखादा उमेदवार लेखी परिक्षेला गैरहजर राहिला तर त्याला पुन्हा लेखी परिक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरिक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल.

- उमेदवाराने पोलीस भरती प्रक्रियेमध्ये उध्दअ गैरवर्तन / अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याचा ,कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रक्रियेमधून बाद करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

- पोलीस भरती मध्ये नियमबाहय दबाव तसेच भ्रष्ट आचरण व वर्तणुक करणा-या उमेदवारास अपात्र घोषित करण्यात येईल.

- लेखी चाचणी दरम्यान उमेदवारास कोणत्याही प्रकारची शारीरिक इजा / नुकसान झाल्यास उमेदवार स्वत:जबाबदार राहिल.

- उमेदवारांनी कोव्हीड-१९ चे अनुषंगाने शासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सॅनिटायझर,मास्काचा वापर करावा व सुरक्षित अंतर ठेवावे.

- उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट / दलाल, अधिकारी / कर्मचारी यांच्या भुलथापांना / अमिषाला बळी पडू नये. उमेदवाराची निवड ही सर्व निकष गुणवतेच्या पात्रतेवर होईल.